**नियमीत दिवाणी दावा क्र.४०८/२०१९**

**शरणम्मा वि. जयश्री**

**नि.क्र.७२**

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ यांचा शपथेवर पुढील उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री.एस.एस.देशमुख यांच्यातर्फे सुरू:-**

अर्ज क्र.४९१/२०१६ द्वारे मी तहसिल कार्यालयात वारस नोंदीकामी अर्ज केला होता. त्यावेळी नोंदीसाठी मी जयश्री गंगाधर मठपती, अमरकांत बंडेप्पा देवर्शे, चंद्रशेखर देवप्पा देवर्शे, भाग्यश्री अंतेश्वर स्वामी अशी चौघांच्या नावचा अर्ज दाखल केलेला होता. अमरकांत बंडेप्पा देवर्शे सध्या काय करतात हे मला माहित नाही. दि.१८/०२/२०१९ ला अमरकांत हा शिक्षण घेत होता. अमरकांत नात्याने माझा भाऊ होय. तो उदगीर येथे शिकतो. दि.१८/०२/२०१९ ला अमरकांत शिक्षण घेत होता हे दाखवण्यासाठी माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८/०२/२०१९ अमरकांत शिक्षण घेत होता हे मी खोटे सांगत आहे. अमरकांत बंडप्पा देवर्शे हा ४० वर्षापासून घर सोडून गेला असल्याचे मला माहित नाही. तो घर सोडून गेला हे नक्की असून कधी गेला हे नक्की मला माहित नाही. अमरकांत घर सोडून निघून गेला असला तरी मी तो भाऊ असल्याने त्याच्या वतीने तहसिल कार्यालयात वारस नोंद व्हावी म्हणून अर्ज केलेला होता. हे म्हणणे बरोबर आहे की, फेरफार क्र.१६५७ द्वारे जयश्री, अमरकांत, चंद्रशेखर, भाग्यश्री, शरणम्मा, ज्योतिर्लिंग, रविशंकर या सर्वांची नोंद घेण्यात

आली होती. फेर प्रत क्र.१६५७ हा अपिलात रद्द झाला का काय याबद्दल मी काही बोलू शकत नाही.

दि.२३/१२/२००९ ला बंडेप्पा रेवन सिध्दप्पा स्वामी यांनी रजिस्टर वाटणी पत्राद्वारे एक हेक्टर क्षेत्र तिच्या नावावर केलेले आहे का काय हे मला माहित नाही. मुकदमा क्र.२४८/२०१५ द्वारे बंडप्पा यांनी तडजोडद्वारे वादीच्या हक्कात मिळकत करून दिली होती का काय हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मिळकत क्र.२१६/२, २१७/२, ३४/ब/२ ही वादीची स्वकष्टार्जीत मिळकत होय. हे म्हणणे खरे नाही की, वादीला दावा मिळकतीची विल्हेवाट लावण्याचा पूर्ण हक्क आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीशी आमचा कोणाचा काहीही संबंध नाही. बंडेप्पाने पोस्टाद्वारे डी.एड्. केले त्याचे कागदपत्र मी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.04.06 12:23:55 +0530

**( श्री. व्ही. आर. घराळ )**

**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**

**उदगीर.**

**ठिकाणः उदगीर**

**दिनांकः– ०४/०४/२०२६**